Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date 03 February 2025
Time 11.00 to 11.05 AM
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक: ०३ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

लोकसभेत आज वक्फ सुधारणा विधेयकावरील संयुक्त समितीचा अहवाल सादर होणार आहे. जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेली संयुक्त समिती हा अहवाल सादर करेल. दिलेल्या पुराव्यांची नोंदही सभागृहासमोर ठेवली जाईल. संयुक्त संसदीय समितीने मसुदा अहवाल आणि सुधारित विधेयक स्वीकारलं तसंच विरोधी पक्षांकडून अहवालावरील त्यांच्या असहमतीच्या नोंदी सादर केल्या आहेत.

****

उत्तर प्रदेशात सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात वसंत पंचमीनिमित्त तिसरं अमृत स्नान आज सुरु आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या चेंगराचेंगरीच्या पार्श्वभूमीवर आज याठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सुरक्षा व्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी अर्धसैनिक दलांसह ५० हजारांहून अधिक पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

दरम्यान, महाकुंभमेळ्यात आतापर्यंत जवळपास ३५ कोटी भाविकांनी पवित्र स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

देशात लाखोंच्या संख्येनं अवैधरित्या राहून राजकीय प्रक्रिया विस्कळीत करणाऱ्या परदेशी नागरीकांपासून सावध राहण्याचं आवाहन. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. अवैध प्रवासी नागरिक देशामध्ये राहणं धोकादायक असून, अशा परदेशी घुसखोरांना निवडणुकीच्या राजकारणावर प्रभाव पाडण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही, देशातल्या युवकांनी अशा राष्ट्र विरोधी घटकांचे मनसुबे हाणून पाडावे, असं आवाहन त्यांनी केलं. नवी दिल्लीत भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या वतीने आयोजित परिषदेत ते काल बोलत होते. युवकांनी यापुढे आपल्या

अस्तित्वासंदर्भातली आव्हानं ओळखून भारतीय अर्थव्यवस्था भक्कम करण्यासाठी आर्थिक राष्ट्रवाद मनात रुजवण्याची गरज असल्याचं धनखड यांनी नमूद केलं.

****

यंदाच्या अर्थसंकल्पात १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर शून्य कर आकारण्याची घोषणा आणि सर्व स्तरावर कर टप्प्यात फेरबदल केल्यामुळे ९० टक्क्यांहून अधिक वैयक्तिक करदात्यांना नव्या कर प्रणालीचा स्वीकार करण्यासाठी प्रवृत्त केलं पाहिजे, असं केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल यांनी म्हटलं आहे. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. कर व्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप सरकारला अपेक्षित नसल्याचंही त्यांनी सांगितलं. आतापर्यंत ७५ टक्के कर दात्यांनी नवीन कर प्रणाली स्वीकारली आहे.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार आहे. भारतीय जनता पक्ष, आम आदमी पार्टी आणि काँग्रेस हे तीन प्रमुख पक्ष रिंगणात असून, मतदारांना आकर्षित करण्यासाठी जोमाने प्रचार करत आहेत. ७० सदस्यांच्या दिल्ली विधानसभेसाठी येत्या बुधवारी पाच तारखेला मतदान होणार आहे; तर आठ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल.

****

आयुर्वेद ही सर्व प्रकारच्या व्याधींवर परिणामकारक उपचारपद्धती असून, यात संशोधन, नवोन्मेश आणि स्टार्टअप सुरु करण्यासाठी, आयुष मंत्रालय चालना देणार असल्याचं, केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं. पुण्यात डॉ. डी. वाय. पाटील आयुर्वेद महाविद्यालयानं आयोजित केलेल्या, आठव्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलनाचं उद्घाटन काल जाधव यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. देशभरात आयुष औषधी केंद्रांचं जाळ उभारण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

गुइलेन बॅरी सिंड्रोम या आजाराची राज्यातली एकंदर रुग्णसंख्या १५८ झाली आहे. ४८ रुग्ण अतिदक्षता विभागात तर २१ रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर असल्याचं आरोग्य विभागाने सांगितलं.

****

बुलडाणा जिल्ह्यात शेगाव, संग्रामपूरसह अनेक तालुक्यांमध्ये अचानक केस गळतीचं प्रमाण वाढलं होतं, याबाबत वैद्यकीय तपासण्या केल्यानंतर सेलेनियम धातूमुळे केस गळती होत असल्याचा अहवाल, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद – आयसीएमआर ने दिला आहे. धान्य टिकवून ठेवण्यासाठी सेलेनियमचा वापर केला

जातो; मात्र हा घटक अन्नधान्यामधून अतिरिक्त प्रमाणात नागरिकांच्या शरीरात गेल्यामुळे केस गळती सुरू झाल्याचं आय सी एम आर नं म्हटलं आहे.

दरम्यान, खामगाव इथल्या धान्य गोदामांची तपासणी प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेतर्फे दिला जाणारा वि. वा. देसाई स्मृती पुरस्कार छत्रपती संभाजीनगर इथल्या 'मुक्तिसोपान न्यास संस्थेला जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह आणि पंधरा हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. आज हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केला जाणार आहे.

****

नाशिकजवळ सापुतारा घाटात खाजगी प्रवासी बसला झालेल्या अपघातात पाच भविकांचा मृत्यू झाला, तर १७ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. धार्मिक पर्यटनासाठी निघालेल्या मध्य प्रदेशातल्या भाविकांची बस २०० फूट दरीत कोसळून हा अपघात झाला.

****

टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेचं विजेतेपद आर प्रज्ञानंदा यानं पटकावलं आहे. काल झालेल्या सामन्यात त्याने सध्याचा विश्वविजेता डी गुकेशवर विजय मिळवला. प्रज्ञानंदा आणि गुकेश दोघेही १३ फेऱ्यानंतर साडे आठ गुणांसह बरोबरीत होते.

****

सलग तीन किंवा त्यापेक्षा अधिक महिन्यांपासून वीजबिल ऑनलाइन भरणाऱ्या लघुदाब वीजग्राहकांसाठी महावितरणने जानेवारी ते मे महिन्याच्या कालावधीसाठी 'लकी डिजिटल ग्राहक योजना' सुरू केली आहे.

****